तुकारामबावाची

गाथा.

भाग दुसरा.

(अभंग १९६८ पासून ४५०० पर्यंत.)

शालिवाहन शके १८०६, तारणनामसंवत्सरे,

आषाढमास.

आवृत्ति दुसरी.

मुंबईत

गणपत कृष्णाजी यांच्या छापखान्याचे मालक आत्माराम कान्होबा

यांणीं छापून प्रसिद्ध केला.

श्री

प्रस्तावना.

(दुसऱ्या आवृत्तीची.)

या पुस्तकाची पहिली आवृत्ति संपल्यामुळें हा ग्रंथ लोकांस फार दुर्मिल झाला होता इतकेंच नाहीं तर हें पुस्तक आपणास लौकर छापून मिळावें अशी कित्येक सद्गृहस्थांनी आपली इच्छा आह्मास प्रदर्शित केल्यावरून सदर गाथ्याची ही दुसरी आवृत्ति लोकोपयोगाकरितां छापून नेमस्त दरानें प्रसिद्ध केली आहे.

मुंबई, आषाढमास }
शा० शके १८०६ }

श्री

प्रस्तावना.

(पहिल्या आवृत्तीची.)

शके १७८६।८७ मध्यें क्षेत्रपंढरपुर एथें एका स्नेह्यानें उद्योग करून तुकारामबावाच्या गाथेची एक प्रत तयार करून पाठविली, व ती सुवाच्य अक्षरानें व चांगल्या शाईनें छापली असतां पुष्कळ वारकरी आदिकरून भाविक लोकांस तिचा उपयोग होईल असें कळविलें. नंतर दुसऱ्या प्रती मिळवून त्यांच्या आधारानें ग्रंथ साद्यंत पाहून, जेथें लेखकानें चुक्या केल्या होत्या असें दिसलें, त्या नीट करून साम्प्रत हा ग्रंथ अत्यादरें सादर केला आहे.

मुंबई, आषाढमास
शा० शके १७८९.

भाग २ रा.

स्वामीनें काया ब्रह्म केली ते अभंग.

शोधीतांचीनये ॥ ह्मणोनीबोळंगतोंपाय ॥ १ ॥ आतां दिसोंनयेजना ॥ ऐसेंकरानारायणा ॥ २ ॥ परतोनीमन ॥ गेलेंठाईंचमुरोन ॥ ३ ॥ विसरलातुका ॥ बोलोंचालोंझालामुका ॥ ४ ॥ ॥ १९६८ ॥

रज्जुसर्पाकार ॥ भासयलेंजगडंबर ॥ १ ॥ ह्मणोनीआठवीतोंपाय ॥ घेतोंआलायबलाय ॥ २ ॥ दृश्यद्रुमाकारलाणी ॥ केलासर्वस्वासीधणी ॥ ३ ॥ तुकीतुकलातुका ॥ विश्वींभरूनीउरलाजोकां ॥ ४ ॥ ॥ १९६९ ॥

ह्मणवीतोदास ॥ परिमीआहेचिउदास ॥ १ ॥ हाचिनिश्चयमाझा ॥ परिमीनिश्चयाहुनीदुजा ॥ २ ॥ सरतेंकर्तृत्वमाझ्यानें ॥ परिमीत्याहुनीअसेंभिन्न ॥ ३ ॥ तुकातुकासीतुकला ॥ तुकीतुकाहुनिनिराळा ॥ ४ ॥ १९७० ॥

घोंटवीनलाळब्रह्मज्ञान्याहातीं ॥ मुक्तआत्मस्थितीसांडवीन ॥ १ ॥ ब्रह्मभूतकायाहोतसेकीर्तनीं ॥ भाग्यतरिऋणीदेवाऐसें ॥ २ ॥ तीर्थभ्रमकासीआणीनआळस ॥ कडूस्वर्गवासकरिनभोग ॥ ३ ॥ सांठवीनतपोनीधिअभीमान ॥ यज्ञआणिदानलाजवीन ॥ ४ ॥ भक्तिभाग्यासीमासाधीनपुरुषार्थ ॥ ब्रह्मीचाजोअर्थनीजठे

वा॥ ५ ॥ धन्यह्मणवीनयाहीलोकींलोकां॥ भाग्यआ
ह्मीतुकादेखीयेला॥ ३॥ ॥ १९७१॥
संसाराचेअंगींऔघींचव्यसनें॥ आह्मीयाकीर्तनेंशुद्ध
झालों॥ १ ॥ आतांहेंसोंवळेंझालेंत्रिभुवन॥ विषमधु
वोनसांडियेलें ॥ २ ॥ ब्रह्मपुरींवासकरीनअखंड ॥ न
देखीजेतोंडविटाळाचें ॥ ३ ॥ तुकाह्मणेआह्मायेकांतीं
चावास॥ब्रह्मींब्रह्मरससेऊंसदा॥ ४॥ ॥१९७२॥
तुह्मीसनकादीकसंत ॥ ह्मणवीतांकृपावंत ॥ १ ॥ येव
ढाकराउपकार॥देवासांगानमस्कार॥ २॥ भाकावी
करुणा॥ विनवापंढरीचाराणा ॥ ३ ॥ तुकाह्मणेमज
आठवा॥ मूळलौकरीपाठवा॥ ४॥ ॥१९७३॥
गरुडाचेपाईं॥ठेविवेळोंवेळांडोई ॥ १ ॥ वेगींआणा
वातोहरी॥ मजदीनातेंउद्धरी ॥ २ ॥ पायलक्षुमीचेहा
तीं॥ तिसीयावेंकाकुळती ॥ ३ ॥ तुकाह्मणेशेषा॥ जा
गेंकराऋषिकेशा॥ ४॥ ॥१९७४॥
आपुल्यामाहेराजाईनमीआतां॥ निरोपयासंतांहातीं
आला ॥ १ ॥ सुखदुःखेंमाझेंआयकिलेंकानीं॥ कळ
वळामनींकरुणेचा ॥ २ ॥ करूनीशीघ्रमूळसाउलेभा
तुके ॥ येतीदिसेयेकन्यावयासी ॥ ३ ॥ त्याचिपंथेंमा
झंलागलेंसेचित्त ॥ वाटपाहेनित्यमाहेराची ॥ ४ ॥ तु
काह्मणेआतांयेतीलन्यावया ॥ अंगेंआपुलीयामाय
बाप॥ ५॥ ॥१९७५॥
चिन्हेंउमटतातीअंगीं॥शकुनाजोगींउत्तम॥१॥ आठ

वलाबापमाय॥ येईलकायमूळनेणो ॥ २ ॥ उत्कंठित
झालेंमन॥ तेचिखूणतेथींची॥ ३॥ तुकाह्मणेह्याकामा
री॥ आळसेंघरींकर्मेंना॥ ४॥ ॥ १९७६॥
आरोनीयांपाहेवाट॥ कटकटसोसेना॥ १ ॥ आलीया
सीपुसेमात॥ तेथेंचित्तलागलें॥ २ ॥ दळीकांडीलोकां
ऐसें ॥ परिमीनसेंतेठाई ॥ ३ ॥ तुकाह्मणेयेथेपिसें॥ ते
थेतैसेंअसेल॥ ४॥ ॥ १९७७॥
येथीलीयाअनुभवें॥ कळोंजीवेंयेतसे ॥ १ ॥ दोहींठा
ईयेकजीव ॥ माझीकीबत्याअंगीं ॥ २ ॥ भूकभुकेचि
खाउनिधाय॥ नाहींहायअन्नाची ॥ ३ ॥ तुकाह्मणेसु
खझालें॥ अंतरधालेंत्यागुणें॥ ४॥ ॥ १९७८॥
पैलआलेहरि॥ शंखचक्रशोभेकरीं ॥ १ ॥ गरुडयेतो
फडल्कारें ॥ नाभीनाभीह्मणेत्वरें ॥ २ ॥ मुगटकुंडलां
च्यादीप्ती ॥ तेजेंलोपलागभस्ती ॥ ३ ॥ मेघशामवर्ण
हरि॥ मूर्तिडोळससाजिरी ॥ ४ ॥ चतुर्भुजवैजयंती॥
गळामाळाहेरुळती ॥ ५ ॥ पीतांबरझळकेकैसा ॥ उ
जळल्यादाहीदिशा ॥ ६ ॥ तुकाझालासेसंतुष्ट ॥ घरा
आलेवैकुंठपीठ॥ ७॥ ॥ १९७९॥
शंखचक्रगदापद्म॥ पैलआलापुरुषोत्तम॥ १ ॥ नाभी
नाभीभक्तराया॥ वेगींपावलोंसखया ॥ २ ॥ दुरुनीये
तोदिसेदृष्टी ॥ धाकेंदोपपळतीसृष्टी ॥ ३ ॥ तुकादेखो
नीयेकला॥ वैकुंठीहुनिहरिआला॥ ४॥ ॥ १९८० ॥
पैलदिसतातीभार॥ दिंडीपताकाअपार॥ १ ॥ आला

पंढरीचाराणा ॥ दिसतातोत्याच्याखुणा ॥ २ ॥ सुखवा
टेमना ॥ डोळेबाह्यास्फुरती ॥ ३ ॥ उठिलेगजरनामा
चे ॥ दळभारवैष्णवांचे ॥ ४ ॥ तुकाकरीरिताठाव ॥ त्यां
सींबैसाबयावाव ॥ ५ ॥ ॥ १९८१ ॥

चलाजाऊंसामोरे ॥ पुढेंभेटोंविठ्ठलधुरे ॥ १ ॥ तुकाआ
नंदलामनीं ॥ कैसाजातोलोटांगणीं ॥ २ ॥ फेडावया
धणी ॥ प्रेमसुखाचीआजी ॥ ३ ॥ पुढेंआलेरुपावंत ॥
मायबापसाधुसंत ॥ ४ ॥ तुकाआळंगीलाबाहीं ॥ ठेवि
लाविठोबाचेपाईं ॥ ५ ॥ ॥ १९८२ ॥

पाहुणेघरासी ॥ आजिआलेह्रषीकेशी ॥ १ ॥ कायक
रूंउपचार ॥ कोपमोडकीजर्जर ॥ २ ॥ कण्यादरदर ॥ पा
ण्यामाजीरांधिल्या ॥ ३ ॥ घरींमोडकीयाबाजा ॥ वरि
वाकळेच्याशेजा ॥ ४ ॥ मुखशुद्धीतुळसीदळ ॥ तुका
ह्मणेमीदुर्बळ ॥ ५ ॥ ॥ १९८३ ॥

संतींकेलाअंगीकार ॥ त्यासीअभिमानथोर ॥ १ ॥ कां
हींठेवीचरणीं ॥ घेतीतेंचिपूरउनी ॥ २ ॥ तुकापायवणि ॥
घेउनीयांनिराळा ॥ ३ ॥ नसतांकांहींसंचित ॥ भेटिझा
लीअवचित ॥ ४ ॥ देवमिळोनियांभक्त ॥ तुकाकेला
सेसनाथ ॥ ५ ॥ ॥ १९८४ ॥

अवघीयाआलोंमुळें ॥ येकवेळेन्यावया ॥ १ ॥ सिद्ध
व्हावेंसिद्धव्हावें ॥ आधिठावेंकरितो ॥ २ ॥ जोंवरीघ
टिकादुरि ॥ आहेउरीतोकाळ ॥ ३ ॥ मंगळाचेवेळेउभे ॥
असाशोभेसावध ॥ ४ ॥ औघीयांचावियोगघडे ॥

तरीजोडेश्लाघ्यता॥ ५ ॥ तुकाह्मणेपाहेवाट॥ बहुआ
टकरूनी॥ ६॥ ॥१९८५॥
सकळहिमाझी बोळवणकरा ॥ परतोनीघराजावेंतु
ह्मी॥ १ ॥ कर्मेंधर्मेंतुह्माअसावेंकल्याण ॥ घ्यामाझेंव
चनभाष्यहेंचि ॥ २ ॥ वाढवूनीदिल्हेंयेकाचियेहातीं॥
सकळनिश्चितीझालीतेथें ॥ ३ आतांमजजाणेप्रा
णेश्वरासवें॥ मीमाझियेभावेंअनुसरलों ॥ ४ ॥ वाढ
वितालोभहोईलउसीर॥ अवघींचस्थीरकराठाई ॥५॥
धर्मअर्थकामझालायेकेठाईं॥मेळविलाजींहींहातीहा
त॥ ६ ॥तुकाह्मणेआतांझालोहेचिभेटी ॥ उरल्यात्या
गोष्टीबोलावया॥ ७॥ ॥१९८६॥
बोलिलोंतेंआतांपाळावेंवचन ॥ कायऐसेंपुण्यमाझे
गांठीं॥१॥ जातोंआतांआज्ञाघेऊनियांस्वामी॥ काळ
क्षेपआह्मीकरूंकोठें॥२॥नघडेयाबरीनधरवेचिधीर॥
पीडितांराष्ट्रेंदेखोनीजग॥३॥ तुकाह्मणेतुह्मींआह्मामो
कलीलें॥कायआतांआलेंजीवित्वाचें ॥ ४॥ १९८७॥
करावेंतेंकाम ॥ उगाचवाढवावाश्रम ॥ १॥ अवघेंये
कमय॥राज्यबोलोंचालोंनये॥ २॥ दुजयाचीसत्ता॥
नचलेसीझालीआतां ॥ ३ ॥ आतांनाहींतुका॥ पुन्हा
ह्मारपलालोका॥४॥ ॥१९८८॥
आह्मीजातोंआतांकृपाअसोंद्यावी ॥ सकळांसांगा
वीविनंतिमाझी ॥ १.॥ बाढवेळझालाउभापांडुरंग ॥
वैकुंठाश्रीरंगबोलावीतो॥ २॥ अंतकाळींविठोआह्मा

सीपावला ॥ कुडीसहितझालागुप्ततुका ॥ ३॥ १९८९॥
तुकाउतरलातुकीं ॥ नवलझालेंतिहींलोकीं ॥ १ ॥ नि
त्यकरितोकीर्तन ॥ हेंचिमाझेंअनुष्ठान ॥ २ ॥ तुकाबै
सलाविमानीं ॥ संतपाहातीलोचनीं ॥ ३ ॥ देवभावा
चाभुकेला ॥ तुकावैकुंठासीनेला ॥ ४ ॥ ॥ १९९० ॥
नदेखिजेऐसेंकेलें ॥ याविठ्ठलेंदुःखासी ॥ १ ॥ रूपेंचि
येसिंव्हासनीं ॥ अधिष्ठानींबैसविलें ॥ २ ॥ वाजतांतो
नलगेवारा ॥ क्षीरसागराशयनीं ॥ ३ ॥ तुकाह्मणेअव
घेठाईं ॥ मजपाईंराखिलें ॥ ४ ॥ ॥ १९९१ ॥
वाराणसीपर्यंतअसोंसुखरूप ॥ सांगावानिरोपसंतां
सीहा ॥ १ ॥ येथोनीयांआह्माजाणेंनिजधामा ॥ सवें
असेआह्मागरुडहा ॥ २ ॥ कृपाअसोंद्यावीमजदीना
वरी ॥ जातसोंमाहेरींतुकाह्मणे ॥ ३ ॥ ॥ १९९२ ॥
चालीलेनवाटे ॥ गाउनीयांजातांवाटे ॥ १ ॥ बरवावै
ष्णवांचासंग ॥ येतोसामोराश्रीरंग ॥ २ ॥ नाहींभयअ
ड ॥ कांहींविषमाचीजड ॥ ३ ॥ तुकाह्मणेभक्ति ॥ सुर
रूपआदिअंतीं ॥ ४ ॥ ॥ १९९३ ॥

शके १५७१ विरोधीनामसंवत्सरेफाल्गुनकृष्ण २
द्वितीयासोमवारींप्रातःकाळींस्वामीगुप्तझाले

भांडणकान्होबाचें व देवाचे ते अभंग

दुःखेंदुभागलेंहृदयसंपुष्ट ॥ गहिवरेंकंठदाटताहे ॥ १
ऐसेंकायकेलेंसुमित्रासखया ॥ दिल्हेटाकोनीयांव
माजी ॥ २ ॥ आक्रंदतीबाळेंकरुणावचनीं ॥ त्याशे

मेदिनीकांपोंपाहे ॥३॥ कायहेंसामर्थ्यनव्हेतुजपाशीं॥ संगेन्यावयासीअंगभूता॥ ४ ॥ तुजठावेंआह्माकोणी नाहींसखा॥ उभयलोकींतुकातुजवीण॥ ५॥ कान्हाह्म णेतुझ्यावियोगेंपोरटीं॥ झालोंदेरेभेटीबंधुराया ॥ ६ ॥

॥ ११९४॥

सख्यत्वासीगेलोंकरितसलगी ॥ नेणेचिअभागीमहि मातूझा ॥ १ ॥ पावलोंआपुलेंकेलेलाहेरस ॥ निदैंवाप रीसकायहोय॥ २॥ कष्टविलासमीचांडाळेंसंसारीं ॥ अ द्यापिबरीतरीउद्देशहि ॥ ३॥ उचितअनुचितसांभाळीलें नाहीं ॥ कान्हाह्मणेकाईबोलोंआतां ॥ ४ ॥ ॥११९५॥

असोआतांकायकरुनीयांखंती ॥कोणाकाकुळतीया वेंआतां॥ १ ॥ करूंकांहींदीसराहावेंउदास ॥ झोंबेल्या लागासभाबाचीया ॥ २॥ करितीरुदनाबापुडेह्मणतीं॥ परिनयेअंतींकोणीकामा ॥ ३ ॥ तुकयाबंधुह्मणेपीडी येलोंबनीं॥ विचारतोमनींबोलीयेला ॥ ४ ॥ ११९६॥

चरफडेचरफडेशोकेंशोकहोय ॥ कार्यमूळआहेधीरा पासीं॥ १ ॥ कल्पतसेमजऐसेंहेंपाहातां ॥ करावीतेचिं तामिथ्याखोटी॥ २ ॥ नचुकेह्लोणारसांढिल्याशूरत्वा॥ फुकटचीसत्वाहोईलहानी ॥ ३ ॥ तुकयाबंधुह्मणेदिल्हें याबंधना॥ वांचूनिनीधानानपवीजे ॥ ४ ॥

॥ ११९७॥

नलगेचिआतांअनुमोदनहाता ॥ आलेंमूळसत्तागे लीत्यांची॥ १ ॥ घरभंग्यायेथेआहेतोसुकाणू॥ धरिनो

कवळूनीपायदोन्ही॥ २॥ त्याचेंत्याचियामुखेंपडियेलें ठावें॥ नलगेसारावेंमागेंपुढें॥ ३॥ तुकयाबंधुह्मणेक रीलभेटीभावा॥ सोडीनतेधवांयाविठ्ठला॥ ४॥

॥ १९९८॥

मूळस्थानत्याचेंगोमतीचेंतीरीं॥ तोहासारीदोरीखेळ वीतो॥ १॥ ऐसेंहेंकळलेंअसोंद्यासकळां॥ चोरत्यावे गळानाहींदुजा॥ २॥ वैष्णवहेंहेरतयाचेपालथी॥ खू णहेनिरुतीसांगीतली॥ ३॥ तुकयाबंधुह्मणेआलेंअनु भवास॥ तेणेंचआह्मासनागविलें॥ ४॥ ॥ १९९९॥

वरारेनिर्गुणानष्टानारायणा॥ घरबुडवणाभेटलासी ॥ १॥ येकेघरींकोणीकोणासीनधरी॥ऐसीआपरापरी केलीआह्मा॥ २॥ काङ्क्षाह्मणेकायनिष्कामदेखिलें॥ ह्मणोनीमनाआलेंकरितोसी॥ ३॥ ॥ २०००॥

धींदधींदतूझ्याकरीनधिंढ्ज्या॥ ऐसेंकायवेड्याजाणि तलें॥ १॥ केलीतरीबरेंमजभेटीभावास॥ नाहींतरी नासआरंभिला॥ २॥ मरावेंमारावेंयाआलेंप्रसंगा॥ कायपांडुरंगापाहातोसी॥ ३॥ तुकयाबंधुह्मणेतुझीमा झीऊरी॥ उडालीनधरींभीडकांहीं॥ ४॥ ॥ २००१॥

भुक्तिमुक्तितुझेंजळोब्रह्मज्ञान॥देंमाझ्याआणूनभावा वेगीं॥ १॥ नकोतूंआपुल्यानेऊंवैकुंठासी॥ देंमाझ्या भावासीआणुनिवेगीं॥ २॥ रिद्धिसिद्धिमोक्षठेवींगुं ढाळून॥देंमाझ्याआणूनभावावेगीं॥ ३॥ नकोहोऊंकां हींहोसीलप्रसन्न॥देंमाझ्याआणूनभावावेगीं॥ ४॥ तुक

यावंधुह्मणेहाहोनाहींतरी ॥ हत्याहोईलशिरींपांडुरंगा ॥५॥ ॥२००२॥

मुख्यआहेआह्मामातेचापढेंगा ॥ तुजपांडुरंगाकोण लेखी॥ १ ॥नकोलावुंआह्मासवेंतूंतोंवरी ॥ पाहादूर वरीविचारूनी॥ २ ॥साव्यसंतजनकेलेमहाराज ॥ न घडेआतांतुजभयनामीं॥३॥तुकयाबंधुह्मणेआईक्य ऐक्यता॥वाढतेंअनंतादुःखेंदुःख॥ ४॥ ॥२००३॥

नयेसोमसरिउपचाराचीहरि ॥ करकरेचेंकरीकाळेंतों ड॥१॥मागतोंइतुकेंजोडुनियांकर॥ठेवोनियांशिरपां यांवरी॥ २॥तुह्माआह्मायेकेठाईंरहिवास ॥ येथेंद्वैतद्वे षकायबरा ॥ ३ ॥ तुकयाबंधुह्मणेबहुतांबहुतांरीती॥ अनंताविनंतिपरिसावीहे॥ ४॥ ॥२००४॥

लालुचाईसाठींबळकाबीभावा॥परिमीजाणदेवाजि रोनेदी॥१॥असोंद्यानिश्चयहामनोमानसीं॥घातली येविशींदृढकास॥ २॥मजआहेबळआळीचेंसबळ॥ फोडीनअंत्राळहृदयतुझें॥३॥करुणारसेंतुकयाबंधुह्म णेभुलवीन॥काढुनघेईननिजवस्तु॥४॥ ॥२००५॥

तुझींवर्में आह्माठावींनारायणा॥परितूंशाहाणाहोतना हीं॥ १ ॥ मगकालाभुलीहाकदेतेवेळे॥होतोसीपरिडो ळेनुघडसी ॥ २॥जाणोनीअज्ञानकरावेंमाहेर ॥ खो टीखोटीहेरतुझींदेवा॥३॥ तुकयाबंधुह्मणेकारणप्रची ती॥पाहानोवेळकितीतेचगुण॥ ४॥ ॥२००६॥

आवघींतुजबाळेंसारिखींनाहींत ॥ नवलवाटतेंपांडुरं
गा॥ १ ॥ ह्मणतांलाजनाहींसकळाचीमाऊली ॥ जव
ळीधरिलीयेकदुरी॥ २॥ येकासुखद्यावेंघेवूनीबोसंगा॥
येकेद्वारींगळाश्रमविति ॥ ३ ॥ येकानवनीतपाजावें
दाटून ॥ येकअन्नअन्नकरतील ॥ ४ ॥ येकासीवाटतें
नबजावेंदूर ॥ येकाचामत्सरजवळीयेतां ॥ ५ ॥ तुक
याबंधुह्मणेनावडतित्यास॥ कासयाव्यालासपांडुरंगा
॥ ६ ॥ ॥ २००७॥

निनावहेंतूला ॥ नावसाजेरेविठ्ठला ॥ बरासिरकावी
ला॥ फाटक्यामध्येंपाव॥ १ ॥ कांहींतरीविचारीलें ॥
पापपुण्यअसेकेलें ॥ भुरळेंघातलें ॥ येकायेकींभावा
सीं ॥ २॥ मुद्राधारणमाळाटिळे॥ बोलरसाळकोंवळे॥
हातींफाशांचेंगुंडाळें॥ कोणचाळेगृहस्थाहे॥ ३ ॥ तुक
याबंधुह्मणेमिस्कीन ॥ करितोसीदेखोन॥ पाहादुरव
रइछिन॥ केलापरीसंसार॥ ४॥ ॥ २००८॥

नाहींघटिकाह्मणसी ॥ लागलागलातुजपासीं ॥ पडि
लेऋषीकेशी॥ जावसकळकरणें॥ १ ॥ माझेंनेलेंपांघ
रूण ॥ ठावेंअसोनिदुर्बळदीन ॥ माणसांमधून ॥ उठ
विलेंखानोऱ्या ॥ २ ॥ आह्मीजोडोनीहोतोंपाणी॥ सं
दिदेवदेवकरूनी॥॥ झालासीकोठोनी ॥ पैदाचोरदेहा
चा ॥ ३ ॥ तुकयाबंधुह्मणेकेलें ॥ उघडेंमजचिउमगी
लें॥ ऐसेंकांहींठेलें॥ होतेंतुजनपुरतें॥ ४॥ ॥२००९॥

कनवाळकृपाळ ॥ उदारदयाळमायाळ ॥ ह्मणवितो

सीपरिकेवळ ॥ गळेकाटूदिसतोसी ॥ १ ॥ कायकेलेंहो
तेंआह्मी ॥ सांगतुझेंयेकेजन्मीं ॥ झालासीजोस्वामी ॥
येवढीसत्ताकरावया ॥ २ ॥ भलेपणाचापवाडा ॥ बरा
दावीलारोकडा ॥ करूनीबंधुवेडा ॥ जोडामाझाविघ
डिला ॥ ३ ॥ तुकयाबंधुह्मणेभला ॥ कैसेंह्मणतातितुज
ला ॥ जीवआमुचानेला ॥ अंतपाहिलाकांहींतरी ॥
॥ ४ ॥ ॥ २०१० ॥
आतांकळोंआलेगुण ॥ अवघेचियावरुन ॥ चोखट
लक्षण ॥ धरिलेंघरघेणे ॥ १ ॥ यानावेंकृपासिंधु ॥ ह्म
णवितोसीदीनबंधु ॥ मजतरिमैंदु ॥ दिसतोसीपाहातां
॥ २ ॥ अमळदयानाहींपोटीं ॥ कठिणतैसाचीकपटी ॥
आंधळ्याचीकाठी ॥ माझीतुवांहिसकिली ॥ ३ ॥ तुक
याबंधुह्मणेपुरता ॥ नाहींबरेंह्मणेअनंता ॥ येऱ्हवींतरि
आस्ता ॥ तुझाघोटभरियेला ॥ ४ ॥ ॥ २०११ ॥
कायसांगेंऋषिकेशा ॥ आहेअनुतापआलाऐसा ॥ गी
ळावयासीनिमिषा ॥ निमिष्यलागोंनद्यावें ॥ १ ॥ मा
झेंबुडवीलेंघर ॥ लेंकरेंबाळेंदारोंदार ॥ लावीलाकाहा
र ॥ तारातीरकरूनी ॥ २ ॥ जीवघ्यावाकिंवाघ्यावा ॥ तु
झाआपुलाकेशवा ॥ इतुकेंउरलेंआहेभावा ॥ याचि
यानिमित्य ॥ ३ ॥ तुकयाबंधुह्मणेजग ॥ बरेंवाईटह्म
णोमग ॥ याकारणेपरित्याग ॥ नसंडाबासर्वथा ॥ ४ ॥
॥ २०१२ ॥
मायबापमीनल्याबरी ॥ घातलेभावाचेआभारी ॥ तो

हिपरिहरि ॥ तुजझालाआसमई ॥ १ ॥ हेकाभक्तींचेउ
पकार ॥ नांदतेंविध्वंसिलेंघर ॥ प्रसन्नतावेव्हारा ॥ शेव
टींहेझालासी ॥ २ ॥ येकाजीवावरि ॥ होतोंदोन्हिकुटुं
बारि ॥ चाळऊंतोवरी ॥ तुजयेतेंरेनिर्लज्जा ॥ ३ ॥ तुक
याबंधुह्मणेभला ॥ आणिककायह्मणवेंतुला ॥ वेडा
त्यानींकेला ॥ तुजसवेंसंमंधु ॥ ४ ॥ ॥ २०१३ ॥
पूर्वीपूर्वजांचीगति ॥ हेचिआयकिलीहोती ॥ सवेंलाउ
नीश्रीपती ॥ निश्चिंतीकेलीतयाची ॥ १ ॥ कांरेपाठीलाग
लासी ॥ ऐसेंसांगऋषीकेशी ॥ अद्यापवरीनपाहासी ॥
कितीतरीह्मणो ॥ २ ॥ जन्मजन्मांतरींदावा ॥ आह्मा
आपणाकेशवा ॥ निमित्यचालवा ॥ कासयास्तवहें ॥
॥ ३ ॥ तुकयाबंधुह्मणेनदेखणा ॥ कितीहोसीनारायणा ॥
देखोंसकवेना ॥ खात्यासीनखातातूं ॥ ४ ॥ ॥ २०१४ ॥
निसुरसंसारकरून ॥ होतोंपोटभरून ॥ केलीविवशी
निर्माण ॥ देवपणदाखविलें ॥ १ ॥ ऐसाकाढियेलानी
स ॥ कायह्मणूसहितवंश ॥ आणिलेंशेवटास ॥ हौसत
रिनपुरे ॥ २ ॥ उरलोंपालव्याशेवटीं ॥ तेंहिनदेखेंदृष्टी ॥
दोघांमध्येंतुटी ॥ रोकडीचीपाडिली ॥ ३ ॥ तुकयाबंधु
ह्मणेगोड ॥ बहुझालेअतिवाड ॥ ह्मणोनीकांबुड ॥ मू
ळासहीतहिखावें ॥ ४ ॥ ॥ २०१५ ॥
वरीजाणतोंसीधर्मनीति ॥ उचितअनुचितश्रीपती ॥
करूंयेतेराती ॥ ऐसीडोळेझांकुनी ॥ १ ॥ आतांजाबका
यकैसा ॥ देसीतोंदेजगदीशा ॥ आणिलावोलसा ॥

आपणाभोंवता ॥ २ ॥ सर्वेंच्चियासुखास्तव ॥ वळेंधरि
लेंअज्ञानत्व ॥ येईलपरीहाभाव ॥ ज्याचात्यासीकार
ण ॥ ३ ॥ तुकयाबंधुह्मणेनाहीं ॥ आतांआह्मांबोलकां
हीं ॥ जोडुनीपाहीं ॥ तुझेंतूंचिघेतलें ॥ ४ ॥ ॥ २०१६ ॥
कांहींबिपत्तिआपदा ॥ आतांआमुचीहोतां ॥ कायहो
ईलअनंता ॥ पाहाबोलोंकासया ॥ १ ॥ बरेंअनायासें
झालें ॥ सायासावीणबोलेचाले ॥ कांबाडचुकलें ॥ के
लेंकष्टावेगळें ॥ २ ॥ बरासांपडलासीवोजा ॥ वर्माबरि
केशीराजा ॥ बोलायासीतुझा ॥ हुजुरचीनाहींसा ॥ ३ ॥
तुकयाबंधुह्मणेढगा ॥ बरादिल्हाहोतायगा ॥ झडकरि
चलागा ॥ चांगदेवेंपावलों ॥ ४ ॥ ॥ २०१७ ॥
देवातुजपैंमाझ्यापूर्वजांचेंऋण ॥ आहेतेंकांनेदीसीअ
झुन ॥ अवगणासीझोडपण ॥ परिजाणजीवेंनसोडीं
॥ १ ॥ कळोंयेईलरोकडें ॥ उभाकरिनसंतांपुढें ॥ तुझेंकाय
येवढें ॥ भयआपुलेंमागतां ॥ २ ॥ आजिवरिहोतोंने
णता ॥ तैंतुजफावलेंअनंता ॥ कवडीचातोआतां ॥
पडोंनेदींचफेर ॥ ३ ॥ ठेबिलायेजीवनीजीव ॥ ह्मणेतुक
याचाबांधव ॥ माझागळातुझापाव ॥ येकेठाईंबांधी
न ॥ ४ ॥ ॥ २०१८ ॥
मागेंअसतासीकळला ॥ उमसघेऊंनसतांदिल्हा ॥ ते
णेचिकाळेंकेला ॥ असतांअवघानिवाडा ॥ १ ॥ इतु
कानलगतांउशीर ॥ नधरितोंभीडभार ॥ सिद्धासीवे
ह्मार ॥ कासयासीघातला ॥ २ ॥ असोनियांमालखरा

किर्तीकेल्यावेरझारा ॥ धरणेंहीदिवसतेरा ॥ माझ्याभ
वेंघतलें ॥ ३ ॥ अझुनितरींइतुक्यावरी ॥ चुकवींजना
चारहरि ॥ तुकयाबंधुह्मणेउरी ॥ नाहींतरीनुरेकांहीं ॥
॥ ४ ॥ ॥ २०१९ ॥
आतांनराहेक्षणएक ॥ तुझाकळलारेलौकिक ॥ नेदीहा
लोंएक ॥ कांहींकेल्यावांचुनी ॥ १ ॥ संमंधपडिलाको
णासी ॥ कायडोळेझांकितोसी ॥ नेईनपांचांपासीं ॥ दे
नाहींतरीबोढुनियां ॥ २ ॥ सुखेनेदिसजाणवले ॥ नास
केल्याविणउगले ॥ तरितेहीविचारिले ॥ आह्मीआहों
तुजआधी ॥ ३ ॥ असेंचिकरुनीकिती ॥ नागविलीना
हींनीति ॥ तुकयाबंधुह्मणेअंतीं ॥ नसोडिसीतेखोडि ॥
॥ ४ ॥ ॥ २०२० ॥
तुजतेंसवेंआहेठावें ॥ घ्यावेंत्याचेंबुडवावें ॥ परितेंआ
ह्मासवें ॥ आतांनफावेकांहीं ॥ १ ॥ नव्हेसोडायाचाध
णी ॥ कष्टेंमेळविलेंकरूनी ॥ पाहाविचारूनी ॥ अटिधरु
नीकामनाहीं ॥ २ ॥ अवघेराहिलेप्रकार ॥ झालोंजीवा
सीउदार ॥ ऐसाहानिर्धार ॥ कळलाअसावाअसला ॥
॥ ३ ॥ आतांनिदसुरनसावें ॥ गांठपडलीकुणव्यास
वें ॥ तुकयाबंधुह्मणेराखावें ॥ देवामहत्वआपुलें ॥ ४ ॥
॥ २०२१ ॥
बहुबोलणेंनयेकामां ॥ वाउगेंतेंपुरुषोत्तमा ॥ येकाची
वचनेंआह्मा ॥ कायसांगणेतेंसांगा ॥ १ ॥ देणेंघेणेंआ
हेकींभंडाई ॥ करणेंआहेसांगभाई ॥ आतांभीडकांहीं ॥

कोणीनधरीसर्वथा॥ २ ॥ मागेंगेलेंजेंहोउनी॥ असोतें धरितनाहींमनीं॥ आतांपुढेंयेथूनी ॥ कैसाकायविचार ॥ ३ ॥ सारखीनाहींअवघीवेळ ॥ हेंतोंकळलेंसकळ॥ तुकयाबंधुह्मणेखळ ॥ खळकरावीतेउरेल॥ ४ ॥

॥२०२२॥

आतांहिनसुटेनचुके॥बोलकांबुडवीसीफिके॥ जनलोकपारिखे॥ अवघेंकेलेंयासाठीं ॥ १ ॥ नयेसरतांनव्हे भलें॥ तुझेंलक्षणकळलें ॥ बैसलासीकाढिलें॥ देहाचें मुळींदिवाळें ॥ २ ॥ दिसतोसीबराबोलकोंवळे ॥ गुणमैंदाचेचाळे ॥ दिसतातीयेवेळे ॥ कायकरूंविसंबोनी॥ ३ ॥ तुकयाबंधुह्मणेदेखतां ॥ अंधबधिरऐकतां॥ कैसेंव्हावें आतां॥इतुकीयाउपरि॥ ४ ॥ ॥२०२३॥

तिहींताळींहेचिहाक॥ ह्मणतीपांढरास्फटिक॥ औघाबुडविलालौकिक ॥ सुखेंचिभीकलागली ॥ १ ॥ थोटा नांवशिरोमणी ॥ नाहींजोडात्रिभुवनीं ॥ ह्मणोनीशाहाणेजेकोणी॥ तुझेदारींबैसतीना ॥ २ ॥ ऐसेंतुझेंकर्तृत्वा॥ सांपडसीयेकाभावा॥ निर्गुणानिलाजिरानिनावा॥ वांचूनिदुजानाइकों ॥ ३ ॥ सर्वगुणेंसंपन्न॥ कळोंआलासीसंपूर्ण॥ तुकयाबंधुह्मणेचरण॥ आतांजीवेंनसोडीं॥ ४ ॥ ॥२०२४॥

तोचिप्रसंगआलासहज ॥ गुजधरितांनयेकाज ॥ नसांडितांलाज॥ पुढेंवोजनदिसे॥ १ ॥ तूंतरनहोसीशाहाणा॥ नयेसांगतांतेंहिमना॥ आपुलाआपणा॥ आतां

प्रयत्नदेखावा ॥ २ ॥ नपुरेपाहातांवाट ॥ घावेंप्रमाण
चोखट ॥ कासघालुनियांनीट ॥ चौघाचारकरावा ॥
॥ ३ ॥ आतांश्रमाचेंकारण ॥ नव्हेव्हावेंउदासीन ॥ न
पडेतयावीण ॥ गांठीतुकयाबंधुह्मणे ॥ ४ ॥ २०२५ ॥
हळुहळुजाड ॥ होतचालिलेंलिगाड ॥ जाणवेलनिवा
ड ॥ नकरिसीपरिपुढें ॥ १ ॥ मीतोसांगोनउतराई ॥ झा
लोंआतांतुजकाई ॥ कळोंयेईलभाई ॥ तैसाकरींविचार
॥ २ ॥ मागेंयुगेंअठ्ठावीस ॥ झालीदिवसाचादिवस ॥
मुद्दलव्याजकासावीस ॥ होसीदेवायेकामें ॥ ३ ॥ तु
कयाबंधुह्मणेराखें ॥ आतांठाकीतीतुझींसुखें ॥ जग
ज्याहिरठाउकें ॥ झालेंनाहींखंडलेंसें ॥ ४ ॥ ॥ २०२६ ॥
पत्रउचटिलेंप्रयत्नें ॥ ग्वाहीकरावयाकारणें ॥ नाहींत
रीपुण्य ॥ तुझ्याकायउणेआह्मा ॥ १ ॥ नावतुझेंचिकरु
नी ॥ आहोंसुखेंपोटभरुनी ॥ केलिजाणवणी ॥ ह्मणो
नाहींह्मणसील ॥ २ ॥ आतांईतुकीयाउपरी ॥ देनको
भलतेंकरी ॥ ह्मणतीरिणकरी ॥ आमुच्याइतुकेउदंड ॥
॥ ३ ॥ तुकयाबंधुह्मणेजागा ॥ आळवावयापांडुरंगा ॥
केलाकाहींमागा ॥ याचिनव्हतीगरज ॥ ४ ॥ २०२७ ॥
माझ्याभावेंकेलीजोडी ॥ नसेरेसीकल्पकोडी ॥ आणि
येलेंधाडी ॥ घालुनीयांआवघेवैकुंठ ॥ १ ॥ आतांनलगें
यावेंजावें ॥ कोठेंकांहींचकरावें ॥ जन्मोजन्मींखावें ॥ सु
खेंबैसोनसेंझालें ॥ २ ॥ असंख्यसंख्यानाहींपार ॥ आनं
देंदाटलेंअंबर ॥ नमायअपार ॥ त्रिभुवनींसांठवितां ॥ ३

औंघेभरलेसदोदित ॥ झालेसुखाचेपर्वत ॥ तुकयाबं
धुह्मणेपरमार्थ॥ धनअद्भुतसांपडलें ॥ ४ ॥ २०२८॥
आतांचुकलेंदेशावर ॥ करणेंअकरणेंसर्वत्र ॥ घरासी
आगर॥ आलासकळसिद्धींचा ॥ १ ॥ झालोंनिघाई
निधान ॥ लागलेअनंतगुणरत्न॥जन्माचेंविच्छिन्न॥
दुःखगेलेंदरिद्र ॥ २ ॥ तारूंलागलेंअवचितें ॥ हेंदोव
लेंआलेंयेथें॥ वोढिलेंसंचितें॥ पूर्वदत्तलाधलें ॥ ३ ॥तु
कयाबंधुह्मणेसीमा॥नाहींआमुचियानामा॥ आतांपु
रुषोत्तमा॥ ऐसासौदागरसांपडला ॥ ४ ॥ २०२९॥
सांपडलेंजुनें॥ आमुच्यावडीलांचेंठेवणें ॥ केलीनारा
यणें ॥ कृपापुण्येंपूर्वींचिया॥१ ॥ सुखेंआनंदरूपअस
तां॥ आह्मीआहोंयाकरितां ॥ निवारिलीचिंता ॥ देणें
घेणेंचूकलें ॥ २॥ झालेंभांडवलघरींचें॥ अमुपनामवि
ठ्ठलाचें ॥ सुकृतभावाचें ॥ हेंतयानेंदाखविलें ॥ ३ ॥ तु
कयाबंधुह्मणेफिटला॥ पांगनाहींबोलायाला॥ चाडदु
सरीविठ्ठला॥ वांचुनिआणिक॥ ४॥ ॥ २०३०॥
वरतेंकरूनियांतोंड ॥ हाकमारीतोप्रचंड ॥ १ ॥ राग
आळवितोनाना॥ गातोकायतेंकळेना ॥ २ ॥ आशा
धरूनियांमनीं॥ कांहींदेईलह्मणोनी॥ ३ ॥ पोटायेका
साठीं॥ तुकाह्मणेझालोंकष्टी॥ ४॥ ॥ २०३१॥
जाळीमहाकर्में॥ दावीनिजसुखवर्में ॥ १ ॥ ऐसेंकळलें
येक ॥ झालोंनामाचेधारक॥ २ ॥ तपाचेसायास॥न

लगेघ्यावावनवास॥३॥तुकाह्मणेयेणें॥कळिकाळ
हेंठेंगणे॥४॥ ॥२०३२॥
येहरिमजदेईकृपादान॥नासींतिमिरदाखवींचरण॥
आर्तपुरवावेभेटीदेऊन॥नकोउपेक्षुंआलियाशरण॥
॥१॥कामक्रोधअहंकारनकोदेहीं॥आशातृष्णामा
याळज्जाचिंताकांहीं॥वासपंढरीचाजन्मसदादेई॥
आणिकदुजेंमागणेंतुजनाहीं॥२॥नामअखंडहृदयीं
राहोवाणी॥नपडोविसरजागृतिस्वप्नीं॥संतसमागम
ऐसादेलावूनी॥आणिकदुजेंकांहींनेणेंतुजवांचूनी॥
॥३॥पंथपुरींचारविसुतपुरेआतां॥आडकरावाभवसिं
धुऐसानव्हता॥नाहींअढथळात्रैलोक्यामाजिसरता॥
विनवीतुकयाबंधुचरणींठेवूनीमाथा॥४॥२०३३॥
तद्दाचेजातीलानाहींभीडभार॥लातामारीथोरलहान
नेणे॥१॥परितोत्याविशेषमनुष्यहोऊन॥करीखंड
मानवडीलांचा॥२॥बेरसागाढवमायनाबहीण॥भुं
केचवीविणभलतेंची॥३॥तुकयाबंधूह्मणेबोकडमात
ले॥नविचारीआपुलेतोंडींमुते॥४॥ ॥२०३४॥
तोहाखरखरेंगाढवाचेबीज॥तेंऐसेंसहजकळोंयेतें॥
॥१॥आपमानिलेंजेणेंश्रेष्ठाचेंवचन॥तेचित्याचीखू
णवोळखावी॥२॥मद्यपीतोपुराअधमयातीचा॥त
याउपदेशाचारागवायां॥३॥तुकयाबंधूह्मणेपिसा
ळलेंसुणे॥आपपरतेणेंनविचारावें॥४॥२०३५॥
मछकूर्मशेषाकोणाचाआधार॥पृथ्वीवीचाभारवाहा

ऱ्या॥ १ ॥कायधाकआह्माकासयाचीचिंता॥ ऐसा
ाअसतांसाहाकारी॥ २ ॥ शंखचक्रगदाआयुधेंअ
पार॥वागवितोभारभक्तांसाठीं॥ ३ ॥ पांडवांजोहरि
राखिलेंकुसरी॥ तोहाबंधुचाकैवारीतुकयाच्या॥ ४ ॥

॥२०३६॥

रामह्मणतांकामक्रोधाचेंदहन॥ होयअभिमानदेशो
धडी॥ १ ॥ रामह्मणतांकर्मतुटेभवबंधन॥ नयेश्रम
शीणस्वप्नामाजी॥ २ ॥ रामह्मणतांजन्मनाहींगर्भवा
स॥नव्हेदारिद्रासपात्रकधीं॥ ३ ॥रामह्मणतांयमश
रणागतबापुडें॥ अढळपदपुढेंकायतेथें॥ ४ ॥ रामह्म
णतांधर्मघडतीसकळ॥ तिमिरपडळनासेहेळा॥ ५ ॥
रामह्मणतांह्मणेतुकयाचाबंधू॥तरिजेलभवसिंधुसंदे
हनाहीं॥ ६ ॥ ॥२०३७॥

मरोनीजाईनगुणनामावरूनी॥तुझ्याचक्रपाणीमाय
बापा॥ १ ॥चुकविलींदुःखेंमायेचावोळसा॥तोडोनि
यांआशापाशतेणें॥ २ ॥ केलीकायातनुहींवशीशीत
ळ॥चिंतातळमळनाहींऐसी॥ ३ ॥ काळेंतोंडकाळेंक
रूनीराहिलें॥भूतमात्रझालेसज्जनसखे॥ ४ ॥तुकया
बंधुह्मणेअवघ्यादशदिशा॥मुक्तरेपरेशातुझ्यापुण्यें॥
॥५॥ ॥२०३८॥

आतांमागतोंतेंऐकनारायणा॥ भावपूर्वकमनापासू
निया॥१ ॥असोंदेमोकळीजिह्वाजरीगाईलगुण॥ना
हींतरीखिळोनिटांकीपरती॥ २ ॥ मातेचियापरिदेख

तिपरनारी॥ठेवीनेत्रतरीनाहींतरीनको ॥ ३ ॥ तरीरें
कंटाळाकरीतिनिंदास्तुतीचा ॥ नाहींतरीकानाचाहि
खेप्रयत्न॥ ४॥ सकळांइंद्रियांचानिग्रहकरूनीयेक ॥र
खावींपृथक्तोडूनीभ्रम॥ ५ ॥ तुकयाबंधुह्मणेतेचिवा
टप्राणा॥पडतांनारायणाविसरतुझा ॥ ६ ॥२०३९॥
नमस्कारींभूतेंविरूनीयांयाति ॥ तेणेंआत्मस्थितिजा
णितली॥ १ ॥ परउपकारींवेचियेल्याशक्ति ॥ तेणेंआ
त्मस्थितिजाणितली ॥ २ ॥ द्वैताद्वैतभावनाहींजयाचि
त्तीं॥ तेणेंआत्मस्थितिजाणितली ॥ ३ ॥ जयाचियेवा
चेनयेनिंदास्तुति॥तेणेंआत्मस्थितिजाणितली॥ ॥ ४॥
उचितअनुचितजाणेंधर्मनीति॥ दृढभावभक्तिमानव
तो॥ ५ ॥ तुकयाबंधुह्मणेवर्कडतेयेर ॥ संसाराचेखर
भारवाही॥ ६॥ ॥२०४०॥
चौदाभुवनेंलोकतिन्हीदाढेजोकवळी ॥ तोसंपुष्टसांब
ळीमध्येंदेखा ॥ १ ॥ उत्पत्तिसंव्हारकरिताजोपाळण॥
तोनंदाचानंदनह्मणवीतसे॥ २॥ असुरतोडरीदैत्यांचा
काळ ॥ झालाद्वारपाळबळीचातो॥ ३॥ लक्ष्मीचास्वा
मीक्षीराचासागरा ॥ उच्छिष्टकवळापसरीमुख ॥ ४॥
तुकयाबंधुह्मणेचतुराचारावो ॥ भावेंतोपाहाहोझाला
वेडा॥ ५॥ ॥२०४१॥
कोणयापुरुषार्थाचीगति॥ आणियेलाहातोहातीं॥ज
हाजपृथ्वीपति॥ केलीख्यातिअद्भुत॥ १ ॥ भलापुंडली
काभला॥ महिमानजायवर्णिला॥दगादेऊनीअवघी

यांला ॥ साठविलाअविनाश ॥ २ ॥ केलेंयेकघरींके
णें ॥ भरलींसदोदितदुकानें ॥ दुमदुमीलींसुखानें ॥ हे
भाग्याचीपंढरी ॥ ३ ॥ तुकयाबंधुह्मणेकिल्लया ॥ संतांचि
याहातींदिल्ह्या ॥ आंगावेगळेंआपुल्या ॥ टाकोनीझा
लामहिमान ॥ ४ ॥ ॥ २०४२ ॥
केलीहाणिलीआंघोळी ॥ येउनिबैसलोंराउळी ॥ १ ॥ आ
जिचेंझालेंभोजन ॥ रामकृष्णनारायण ॥ २ ॥ तुकया
बंधुह्मणेनाश ॥ नाहींकल्पांतींजयास ॥ ३ ॥ २०४३ ॥
तुजलागींमाझाजीवझालापिसा ॥ अवलोकीतोंदि
शापांडुरंगा ॥ १ ॥ सांडिलाव्हेहारमायालोकाचार ॥
छंदनिरंतरहाचीमनीं ॥ २ ॥ आइकिलेंकानींतेंरूपलो
चन ॥ देखावयाशीणकरिताती ॥ ३ ॥ प्राणहावीकळ
होयकासावीस ॥ जीवनाविणमच्छतयापरी ॥ ४ ॥
तुकाह्मणेआतांकोणताउपाव ॥ करूंतुझेपावआतुडेतो
॥ ५ ॥ ॥ २०४४ ॥
कोणेगांवींआहेसांगाहाविठ्ठल ॥ जरिठावाअसेलतु
झाकोणां ॥ १ ॥ लागतसेंपायांयेतोंलोटांगणी ॥ मातरी
कोणीसांगायाची ॥ २ ॥ गुणरूपयाचेंवाणीतांयासंतां ॥
मजक्षेमदेतांसुखवाटे ॥ ३ ॥ सर्वस्वेंहाजीवठेवीनचर
णीं ॥ पांडुरंगकोणीदावीतया ॥ ४ ॥ तुकाह्मणेगाईवत्सा
ताडातोडी ॥ तैसीजातीघडीयेकीमज ॥ ५ ॥ २०४५ ॥
विठ्ठलमाझाजीवविठ्ठलमाझाभाव ॥ कुळधर्मदेववि
ठ्ठलमाझा ॥ १ ॥ विठ्ठलमाझागुरूविठ्ठलमाझातारू ॥

उतरिलपारूभवनदीचा ॥ २॥ विठ्ठलमाझीमाताविठ्ठलमाझापिता॥ विठ्ठलचुलताबहिणबंधु ॥ ३॥ विठ्ठलहेजनविठ्ठलमाझेंमन॥सोयरासज्जनविठ्ठलमाझा॥४॥ तुकाह्मणेमाझाविठ्ठलविसावा ॥ नश्वरितगांवाजाईनत्याच्या॥५॥ ॥२०४६॥

येकाचियेसोईकवित्वाचेबांधे ॥ बांधलीयासाधेकायतेथे॥ १ ॥ कायहातींलागेभूसाचेकांडणीं ॥ सत्यासीदाटणीकरुनीठेवी ॥ २ ॥ कवित्वाचेरूढीपायांपाडिजग॥ सुखावोनीमगनरकाजाय ॥ ३ ॥ तुकाह्मणेहोयकेल्याविणसाध्य॥फजीतितीआहेलटिक्याअंगीं॥४॥ ॥२०४७॥

भल्याचेंदरुशन॥ तेथेशुभर्चीवचन ॥ १ ॥ बोलावीहेधर्मनीत ॥ क्षोभेंहोतनाहींहित॥ २ ॥ मर्यादातेवरी ॥ वेळजाणावीचतुरीं ॥ ३ ॥ तुकाह्मणेबहु॥ लागेऐसेंबरेंमऊ॥ ४॥ ॥२०४८॥

आवडीनेधरीलींनावें॥ प्रियभावेंचिंतन ॥ १ ॥ वेडाझालावेडाझाला॥ लाचावलाभक्तीसी ॥ २ ॥ निचाडहाचाडधरी॥ तुळसीकरींदळमागे॥ ३॥ धरिलामगनकरीबळ॥ तुकाह्मणेकळपाई॥ ४॥ ॥२०४९॥

कंठींराहोनाम ॥ अंगींभरूनीयांप्रेम॥ १ ॥ ऐसेकांहींद्यावेंदान॥ आलोंपतीतशरण ॥ २ ॥ संतांचीयेपाईं॥ ठेवींवळोवेळांडोई॥३॥तुकाह्मणेतरे ॥ भवसिंधुयेकसरें॥ ४॥ ॥२०५०॥

विठ्ठलविठ्ठलयेणेछंदें॥ ब्रह्मानंदेंगर्जावें॥ १॥ वाहेटाळ
टाळ्याटाळी॥ होयहोळीविघ्नांची॥ २॥ विठ्ठलआदिअ
वसानीं॥ विठ्ठलमनींस्मरावा॥ ३॥ तुकाह्मणेविठ्ठलवा
णी॥ वदाकानींवारता॥ ४॥ ॥ २०५१॥
पंढरीचेवारकरी॥ तेअधिकारीमोक्षाचे॥ १॥ पुंडलीका
दिलाबर॥ करुणाकरविठ्ठलें॥ २॥ मूढपापीजैसेतैसे॥
उतरीकासेलाउनी॥ ३॥ तुकाह्मणेखरेंझालें॥ येकाबो
लेंसंतांच्या॥ ४॥ ॥ २०५२॥
अमृताचींफळेंअमृताचीवेली॥ तेचिपुढेंचालीबीजा
चीहि॥ १॥ ऐसीयाचासंगदेईनारायणा॥ बोलावा
वचनाजयाचीया॥ २॥ उत्तमसेवनशीतळकंठासी॥
पुष्टिकांतितैसीदिसेवरी॥ ३॥ तुकाह्मणेतैसेहोईजेतसं
गें॥ वासलागेअंगेचंदनाच्या॥ ४॥ ॥ २०५३॥
पंढरीसीजारेआलेतोसंसारा॥ दीनांचासोयरापांडुरं
ग॥ १॥ वाटपाहेंउभाभेटीचीआवडी॥ कृपाळुतांत
डीउतावीळ॥ २॥ मार्गंलपरीहारपुढेंनाहींशीण॥ झा
लीयादर्शनयेकवेळा॥ ३॥ तुकाह्मणेनेदिआणिकाचे
हातीं॥ बैसलातोचित्तींनिवडेना॥ ४॥ ॥ २०५४॥
नकळेतेंकळोंयेईलउगलें॥ नामेंयाविठ्ठलेंयेकाचिया
॥ १॥ नदिसेतेंदिसोंयेईलउगलें॥ नामेंयाविठ्ठलेंयेका
चिया॥ २॥ नबोलोतेंबोलोंयेईलउगलें॥ नामेंयावि
ठ्ठलेंयेकाचिया॥ ३॥ नभेटतेंभेटोंयेईलआपण॥ क
रितांचिंतनविठोबाचें॥ ४॥ अलभ्यतोलाभहोईलअ

पार॥ नामनिरंतरह्मणतांवाचें ॥ ५ ॥ तुकाह्मणेआस
क्तजीवसर्वभावें ॥ तरतीलनावेंविठोबाच्या ॥ ६ ॥
॥ २०५५॥
बहुजन्मेंकेलालाग॥ तोहाभागलाधलों ॥ १ ॥ जीव
देईनबळी॥ करीनहोळीसंसारा ॥ २॥ गेलेंमगनयेहा
ता॥ पुढतींचिंतावाटतसे ॥ ३॥ तुकाह्मणेतांतडकरूं॥
पायधरूंबळकट॥ ४॥ ॥ २०५६॥
भक्तिप्रेमसुखनेणवेआणिका ॥ पंडितवाचकाज्ञानी
यासी ॥ १ ॥ आत्मनिष्ठतरीझालेजीवन्मुक्त ॥ तरीभ
क्तिसुखदुर्लभत्यां॥ २॥ तुकाह्मणेकृपाकरीनारायण॥
तरीचेंहेंवर्मठाईपडे॥ ३॥ ॥ २०५७॥
दुधाळगाढवीजरीझालीपाहे ॥ पावेलतीकायधेनुस
री॥ १ ॥ कागाचीयागळांपुष्पांचीयामाळा ॥ हंसाची
तेकळाकायजाणे ॥ २ ॥ मर्कटेंअंघोळीलावियेलेटि
ळे॥ ब्राह्मणाचेलीळेवर्तूंनेणे ॥ ३ ॥ जरीतोब्राह्मणझा
लाकर्मभ्रष्ट॥ तुकाह्मणेश्रेष्ठतिहींलोकीं॥४॥ ॥२०५८
देवभक्तालागींकरूनेदीसंसार ॥ अंगेंवारासारकरीत
से ॥ १ ॥ भाग्यद्यावेंतरिअंगीभरेताठा॥ ह्मणोनीकरं
टाकरुनीठेवी॥२॥ स्त्रीद्यावीगुणवंतीनस्तीगुंतेआशा॥
यालागींकर्कशाकरुनीठेवी॥ ३॥ तुकाह्मणेसाक्षमज
आलीदेखा ॥ आणिकयालोकांकायसांगों ॥ ४ ॥
॥ २०५९॥
वाघेंउपदेशिलाकोल्हा ॥ सुखेखाऊंद्यावेमला॥ १ ॥

अंतरींमरसीतेंनचुके ॥ मजकामारीतोसीभुकें ॥ २ ॥
येरुह्मणेभलाभला ॥ निवाडतोतुझ्यातोंडेंझाला ॥ ३ ॥
देहेतोजाणार ॥ घडेलहाउपकार ॥ ४ ॥ येरुह्मणेमनीं ॥
ऐसेजावेंसमजुनी ॥ ५ ॥ गांठिपडलीठकाठका ॥ त्या
चिवमैंबोलेतुका ॥ ६ ॥ ॥ २०६० ॥
जेथेआठवीतीस्वामीचेतेपाय ॥ उत्तमतोठायरम्यस्थ
ळ ॥ १ ॥ रानअथवाघरयेकांतलोकांत ॥ समाधान
चित्ततेंतेघडी ॥ २ ॥ धन्यतोहाकाळस्मरेआनंदरूप ॥
वाहातांसंकल्पगोविंदाचे ॥ ३ ॥ तुकाह्मणेलाभकाळ
तेचिजीणे ॥ भाग्यनारायणेउत्तमते ॥ ४ ॥ ॥ २०६१ ॥
तुजनभेमीकळिकाळा ॥ मजनामाचाजिव्हाळा ॥ १ ॥
माझाबळियानेणसीकोण ॥ संतासाह्यनारायण ॥ २ ॥
शंखवधीलासागरीं ॥ वेदघेउनिआलाच्यारी ॥ ३ ॥
कूर्मेंदैत्यवधिलाजेठी ॥ हातपायलपवीपोटीं ॥ ४ ॥
वराहरूपधरिलेंगाढें ॥ धराप्रतापेंधरिलीदाढे ॥ ५ ॥ हिर
ण्यकश्यपविदारिला ॥ भक्तप्रल्हादरक्षिला ॥ ६ ॥
वामनझालादीनानाथ ॥ बळिपाताळींघातलादैत्य ॥
॥ ७ ॥ छेढुनीयांसहस्त्रभुजा ॥ कामधेनुआणिली
वोजा ॥ ८ ॥ शिळाप्रतापेंसागरींतारी ॥ स्थापीबिभी
षणारावणामारी ॥ ९ ॥ मारुनीयांकंसराव ॥ पि
तासोडविलावसुदेव ॥ १० ॥ पांचालीसीगांजितांवै
री ॥ वस्त्रेंआपणझालाहरी ॥ ११ ॥ गजेंद्रस्मरेरामराम ॥
त्यासीपाववीवैकुंठधाम ॥ १२ ॥ तुकाह्मणेहरिरूपझा

ले॥ पुन्हाजन्मानाहींआले॥ १३॥ ॥ २०६२॥

सर्वांभूतींद्यावेंअन्न ॥ द्रव्यपात्रविचारुन ॥ उपतिष्ठे कारण ॥ तेथेबीजपेरिजे ॥ १ ॥ पुण्यकरितांहोयपाप ॥ दुधपाजोनीपोसीलासाप ॥ करुनीअघोराचाजप ॥ दुःखविकतघेतलें ॥ २ ॥ भूमीपाहतांनाहींवेगळी ॥ माळबरडयेककाळीं ॥ उत्तमनिराळी॥ मध्यमतेकनि ष्ठ॥ ३॥ ह्मणोनीविवेकें॥ कांहींकरणेतेंनिकें ॥ तुकाह्म णेफिकें ॥ रुचिनेदीमिष्टान्न ॥ ४॥ ॥ २०६३॥

वर्ततांबासर॥कायकरावेंशरीर॥ १ ॥ ठेवीनेमूननेमू न॥ माझेंतुमचेपाईंमन॥ २॥ नेदावीयावृत्ति ॥ कोठें फांकोचिश्रीपति ॥ ३ ॥ तुकाह्मणेभलें॥ जन्मायेऊनी यांझालें॥ ४॥ ॥ २०६४॥

केलीप्रज्ञामनासी ॥ तरीमीदानसत्यत्वेसी ॥ नेईनपा यांपासीं॥ स्वामीमूळपंढरिये॥ १ ॥ तोंवरीहेभरीपोट॥ केलातोमिथ्याबोभाट ॥ नाहींसांपडलीवाट ॥ सयरा टफिरतसे॥ २॥ जावेंआदराचेंजाणें ॥ स्वामीकृपाहो यतेणें॥ पाळिल्यावचनें ॥ सख्यत्वाचाअनुभव॥ ३॥ घडेतैसेंघडोआतां ॥ मायबापाचीतेसत्ता॥ तुकाह्मणे चिंता॥ कायपाहेमारग॥ ४॥ ॥ २०६५॥

नेत्रझांकोनीयांकायजपतोसी ॥ जंवनाहींमानसींप्रे मभाव ॥ १ ॥ उघडामंत्रजाणारामकृष्णह्मणा॥ तुट तीयातनागर्भवास॥ २ ॥ मंत्रतंत्रकांहींकरितिजडबु द्धी॥ तेणेंभूतस्रष्टिपावशील॥ ३ ॥ तुकाह्मणेऐकसुंदर

मंत्रयेक॥ भवसिंधुतारकरामनाम॥ ४॥ ॥२०६६॥
संतमारगींचालती॥ त्यांचीलागोमजमाती॥ १ ॥ का
यकरावींसाधनें ॥ कायनव्हेयेकतेणें ॥ २॥ शेषघेईन
उच्छिष्ट ॥ धायधणीवरीपोट ॥ ३ ॥ तुकाह्मणेसंतांपा
ई॥ जीवठेविलानिश्चयीं॥ ४॥ ॥२०६७॥
जैसेंतैसेंबाळमातेसीआवडे॥ बोलतांबोबडेशब्दगोड
॥ १ ॥ आपुलेआवडीलेववीखाववी॥ पाहोनियांजी
वींसुखवाटे॥ २ ॥ तुकाह्मणेकायदेऊंपरिहार॥ काय
तेसाचारजाणतसा ॥ ३ ॥ ॥२०६८॥
देवाचियावस्त्रास्वप्नींहीनाठवी॥ स्त्रियेसीपाठवीउंचसा
डी॥ १ ॥ गाईचेंपाळणनयेचिविचारा ॥ अश्वासींख
राराकरीअंगें॥ २ ॥ लेंकुराचीगांडस्वयेंधांवेक्षाळूं॥ न
ह्मणेप्रक्षाळूंद्विजपायां ॥ ३ ॥ तुकाह्मणेत्याच्यातोंडाव
रीथुंका ॥ जातोयमलोकाभोगावया ॥ ४॥ २०६९॥
ऊरालावीऊरआळंगितांकांता ॥ संतांसीभेटतांआंग
चोरी॥ १ ॥ अतिथिदेखोनीहोयपाठिमोरा ॥ व्यात्या
सींसामोराजायवेगीं॥ २॥ द्विजानमस्कारामनींभाव
कैंचा ॥ तुर्कांचेदासीचालेंकहोय ॥ ३ ॥ तुकाह्मणेतुह्मी
क्रोधासीनयावें ॥ स्वभावाकरावेंकायकोणी ॥ ४ ॥
॥ २०७० ॥
ब्रह्मज्ञानजरीकळेउठाउठी॥ तरीकांहिंपुटीवेदशास्त्रें॥ १
शास्त्रांचेंभांडणतपतीर्थाटण ॥ पूर्वींचभाषणयाजसा
ठीं॥ २॥ याजसाठींजपयाजसाठींतप ॥ व्यासेंहिअमु

पग्रंथकेले ॥ ३ ॥ याजसाठींसंतपायहेसेवावे ॥ तरीच
तरावेंतुकाह्मणे ॥ ४ ॥ ॥ २०७१ ॥
गायत्रीविकुनीपोटजेजाळीती ॥ तयांहोयगतीयमलो
कीं ॥ १ ॥ कन्येचाजेनरकरीतीविकरा ॥ तेजातिअघो
रानर्कपाता ॥ २ ॥ नामगाऊनीयांद्रव्यजेमागती ॥ ने
णोंतयांगतिकैसीहोय ॥ ३ ॥ कैसेंहोइलत्यांचेंतेचिहो
जाणती ॥ आह्मासीसंगतिनलगेत्यांची ॥ ४ ॥ आमुचा
सांगातींआहेतोश्रीहरी ॥ नलगेदुराचारीतुकाह्मणे ॥ ५ ॥
॥ २०७२ ॥
साधूच्यादर्शनालाजसीगव्हारा ॥ वेश्येचियाघरापुष्पें
नेसी ॥ १ ॥ वेश्यादासीमुरळीजगाचीवोंगळी ॥ तेतुज
सोंवळीवाटेकैसी ॥ २ ॥ तुकाह्मणेआतांलाजधरींबु
च्या ॥ टांचराच्याकुच्यामारावेगीं ॥ ३ ॥ ॥ २०७३ ॥
राउळासीजातांत्रासमानीमोठा ॥ बैसेतोचोंहाटाआ
दरेंसी ॥ १ ॥ नकरिस्नानसंध्यानह्मणेरामराम ॥ गुडगु
डीचेंप्रेमअहर्नीशीं ॥ २ ॥ देवाब्राह्मणासीनजायशर
ण ॥ दासीचेचरणवंदीभावें ॥ ३ ॥ सुगंधचंदनसांडो
नियांमाशी ॥ बैसेदुर्गंधीसीअत्यादरें ॥ ४ ॥ तुकाह्मणे
अरेऐकभाग्यहीना ॥ कांरेरामराणावीसरसी ॥ ५ ॥
॥ २०७४ ॥
दुर्बुद्धीतेमना ॥ कदानुपजोनारायणा ॥ १ ॥ आतांमज
ऐसेंकरीं ॥ तुझेपायचित्तींधरीं ॥ २ ॥ उपजलाभावो ॥
तुझ्याकृपेंसिद्धिजावो ॥ ३ ॥ तुकाह्मणेआतां ॥ लाभना

हींयापरता ॥ ४॥ ॥ २०७५॥
तरुवरबीजापोटीं ॥ बीजतरुवराशेवटीं॥ १॥ तैसेंतुझा
आह्माझालें॥ येकियेकसमावलें ॥ २ ॥ उदकावरील
तरंग॥ तरंगउदकाचें अंग॥ ३ ॥तुकाह्मणेबिंबछाया॥
ठाईंपावलीविलया॥ ४॥ ॥ २०७६॥
साखरेच्यागोण्याबैलाचीयेपाठी॥ तयासीशेवटींकड
बारे॥ १ ॥ मालाचेपैंपेठेवाहाताततिउंटें॥ तयालागिकां
टेभक्षावया॥ २॥ वाउगाचिधंदाआशावाढवीती॥ बां
धोनियांदेतीयमाहातीं ॥ ३ ॥ जयासीअसेलाभतोचि
जाणेगोडी॥ येरतींबापुडींसिणलींवायां॥ ४॥ तुकाह्म
णेशाहाणाहोईंरेगव्हारा॥ चौऱ्याशींचाफेराफिरूंनको
॥ ५॥ ॥ २०७७॥
चिरगुटेंघालूनीवाढवीलेंपोट ॥ गरवारबोभाटजनाम
ध्यें ॥ १ ॥ लटिकेचिडोहळेदाखवीप्रकार॥ दूधस्तनींपो
रपोटींनाहीं॥ २॥ तुकाह्मणे अंतींवांझतेचिखरी॥ फजा
तीदुसरीजनामध्यें॥ ३॥ ॥ २०७८॥
माझीसर्वचिंताअसेविठोबासी॥ मीत्याच्यापायांशीं
नविसंबें॥ १॥ विसरतांरूपक्षणयेकचित्तीं ॥ जिवल
